उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा लाभ महाडीबीटी पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांना देण्याकरीता महाआयटी यांनी सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या सेवांसाठी आलेल्या खर्चाची रक्कम सन २०१९-२० मधील मंजूर तरतूदीतुन अदा करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.७८/१९/मशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१९.

वाचा : १) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान संचालनालय),क्र.मातंस-२०१८/प्र.क्र.११७/से-१/३९, दिनांक २२.०५.२०१९.
२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८-१९/डीबीटी/७३७७, दिनांक ३०.०५.२०१९

प्रस्तावना :

राज्य शासनाने शासकीय योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना पोहविण्यासाठी विकसीत केलेले महाडीबीटी पोर्टल माहे ऑगस्ट,२०१८ मध्ये कार्यान्वित झालेले असून या पोर्टलवरुन पात्र विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविणे, महाविद्यालय व विभाग स्तरावरुन अर्जांची छाननी करणे, शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांचे देयक काढण्यासाठी अलॉटमेंट उपलब्ध करुन देणे तसेच पीएफएमएस प्रणालीद्वारे शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्याचे आधार संलग्न बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीचे वितरण करणे आदि कार्यवाही महाआयटी व महाऑनलाईन यांच्या मार्फत करण्यात येते. यासाठी सन २०१८-१९ मध्ये आलेल्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१८-१९ करीता उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा महाडीबीटी पोर्टलद्वारे लाभ थेट लाभार्थ्यांना देण्याकरीता महाआयटी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या सेवांसाठी माहे ऑगस्ट, २०१८ ते माहे जानेवारी, २०१९ या कालावधीचे रु.६५,२९,०७४/- तसेच माहे फेब्रुवारी, २०१९ ते मार्च,२०१९ या कालावधीचे रु.१४,४२,८०५/- असा एकूण रु.७९,७१,८७९/- (रुपये एकोणऐंशी लक्ष एकाहत्तर हजार आठशे एकोणऐंशी फक्त) इतका खर्च सन २०१९-२० मधील मंजूर तरतूदीतुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबींवर होणारा खर्च ""मागणी क्र.डब्लू-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण,८००, इतर खर्च (०२)(०९) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख पेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी (२२०२ १४५६) ३१ सहाय्यक अनुदाने". या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० मध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ मधील अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग एक मधील अ.क्र.६ नियम ४० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील तसेच इतर संबंधित शासन निर्णयामधील तरतुदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२५१२०६०७६२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec5420633722d42e0976d82a8, serialNumber=284a4236ae7795d36dd2ecb5ac6ca70c333a3cf1b13f66828d224ae2026b37e9, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2019.06.25 12:13:53 +05'30'

(हे.पं. बाविस्कर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखापाल लेखा वअनुज्ञेयता,महाराष्ट्र १/२ , मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल लेखापरीक्षा,महाराष्ट्र १/२ , मुंबई/नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
५. कार्यासन (साशि-१/मशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. निवड नस्ती,कार्यासन मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.